शुक्रवार, दि. ६ फेब्रुवारी २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक १५८ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अ‍ॅण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

### पत्रकारांवर दबाव टाकण्याचा नवा फंडा?

# गुत्तेदार भावाच्या 'आदेशवजा' तक्रारीवर गंभीर प्रश्नचिन्ह

**जालना । प्रतिनिधी** - जिल्हा परिषद बांधकाम विभागातील कथित गैरकारभाराबाबत माहिती घेत असताना एका पत्रकारावर 'शासकीय कामात अडथळा' केल्याचा आरोप करत तक्रार दाखल करण्यात आल्याची घटना समोर आली असून, या प्रकरणामुळे पत्रकारांच्या स्वातंत्र्यावर थेट आघात झाल्याची भावना व्यक्त केली जात आहे.
विशेष म्हणजे, या तक्रारीच्या चार दिवस आधीच संबंधित शासकीय गुत्तेदाराच्या भावाविरोधात पत्रकाराने कदीम जालना पोलीस ठाण्यात जीवे मारण्याची धमकी व शिवीगाळ निर्माण केल्याबाबत तक्रार दाखल केली होती.
यामुळे ''पत्रकाराच्या तक्रारीला उत्तर म्हणूनच सूडबुद्धीने ही तक्रार दाखल करण्यात आली का?'' असा गंभीर सवाल उपस्थित होत आहे.

**आधी पत्रकाराची तक्रार, नंतर प्रतितक्रार**

पत्रकाराने दिलेल्या तक्रारीत, बातमीच्या अनुषंगाने माहिती विचारत असताना गुत्तेदार व त्याच्या भावाकडून अरेरावी, शिवीगाळ व धमकी देण्यात आल्याचा उल्लेख आहे. या घटनेनंतर चार दिवसांनी गुत्तेदाराच्या भावाने थेट पोलीस प्रशासन व जिल्हा प्रशासनाकडे पत्रकाराविरोधात तक्रार सादर केली. ही बाब पाहता, बातमी थांबवण्यासाठी दबावतंत्राचा वापर केला जात आहे का? असा प्रश्न उपस्थित होतो.

**'शासकीय कामात अडथळा' हा आरोप कितपत योग्य?**

या प्रकरणातील सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे तक्रारदार स्वतः शासकीय गुत्तेदार नाही, तर गुत्तेदाराचा भाऊ आहे. कायद्याच्या दृष्टीने शासकीय गुत्तेदार हा लोकसेवक ठरत नाही. त्याचा भाऊ तर अजिबातच शासकीय कर्मचारी किंवा लोकसेवक नाही.
अशा परिस्थितीत, शासकीय कामात अडथळा आणल्याचा आरोप लावणे हे कायदेशीरदृष्ट्या टिकणारे आहे का? याबाबत तज्ज्ञांकडून शंका व्यक्त केली जात आहे.

**कलमांची सरमिसळ कायदेशीर गोंधळ?**

तक्रारीत भारतीय दंड संहिता १८६०, माहिती तंत्रज्ञान कायदा २००० व भारतीय न्याय संहिता २०२३ मधील विविध कलमांचा उल्लेख करण्यात आला आहे. मात्र, काही कलमे परस्परांशी विसंगत असल्याचे दिसून येते.
यामुळे, ही तक्रार कायदेशीर अभ्यास न करता घाईघाईने, केवळ दबाव निर्माण करण्यासाठी तयार करण्यात आली असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

**'आदेशवजा' तक्रार प्रशासनालाही दबाव?**

तक्रारीत थेट एफआयआर नोंदविण्याचे आदेशात्मक स्वरूपातील उल्लेख असल्याने, तक्रारदार स्वतःला मोठा अधिकारी समजतो आहे का? असा प्रश्न उपस्थित होत आहे. यामुळे पोलीस प्रशासन व जिल्हा प्रशासनालाही एक प्रकारे दिशाभूल करण्याचा प्रयत्न होत असल्याची टीका होत आहे.

### तो धमकी वजा व्हॉटस्अप मॅसेज पाठविणारा कोण?

जिल्हा परिषदेच्या एका अधिकाऱ्यांला व्हॉटस्अपद्वारे धमकावत बीले काढण्याचा प्रकार घडला असल्याची चर्चा जिल्हा परिषद परिसरात गुरुवार (दि ५) दिवसभर सुरु असल्याने गेल्या दोन दिवसात कोण-कोणत्या गुत्तेदारांची बिले निघाली. आणि त्या गुत्तेदारांची त्यांच्या भावाची, गुत्तेदारांकडे असलेल्या कामावरील व्यक्तींची व जिल्हा परिषदेतील अधिकाऱ्यांच्या व्हॉटस्अप मॅसेजेसची चौकशी करण्यात यावी अशी मागणी सर्वसामान्यांतून व्यक्त होत आहे. शासकीय गुत्तेदार म्हणून इतर कुणी कामे करतो आहे का याचीही शहानिशा जिल्हा परिषद प्रशासनाने करणे आवश्यक आहे कारण, शासकीय गुत्तेदारांऐवजी इतर कुणी कामे करत असतील तर त्या कामाचा दर्जा राखला जाणार नाही.

**पत्रकाराचा घटनात्मक अधिकार**

पत्रकार हा जनतेच्या वतीने माहिती संकलन करतो. माहिती घेणे, प्रश्न विचारणे आणि सत्य समोर आणणे हा त्याचा घटनात्मक अधिकार आहे. हा अधिकार वापरल्यामुळे पत्रकारावर गुन्हे दाखल करण्याचा प्रयत्न केला जात असेल, तर तो लोकशाहीच्या चौथ्या स्तंभावर थेट हल्ला ठरतो.

**पत्रकार संघटनांची भूमिका**

जालन्यातील पत्रकार संघटनांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेतली असून, ही बाब वैयक्तिक वादापुरती मर्यादित नसून पत्रकारितेच्या स्वातंत्र्याशी निगडीत असल्याचे स्पष्ट केले आहे. पत्रकारांनी एकसंध होऊन अशा दबावतंत्राविरोधात उभे राहण्याची गरज असल्याचे मत व्यक्त होत आहे.

**पत्रकार संरक्षण कायदा अंमलबजावणीवर प्रश्न**

महाराष्ट्रात पत्रकार संरक्षण कायदा अस्तित्वात असतानाही, अशा घटनांमध्ये त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याची टीका होत आहे.
या प्रकरणात तक्रारीची सखोल चौकशी करावी. गुत्तेदार व त्याच्या भावाविरोधात पत्रकाराला धमकी दिल्याप्रकरणी तात्काळ गुन्हा दाखल करावा. दोन्ही बाजूंची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करावी. अशी मागणी होत आहे.

**पोलिसांची भूमिका महत्त्वाची**

आता सर्वांचे लक्ष कदीम जालना पोलीस ठाण्याकडे लागले आहे. पत्रकाराने दिलेल्या तक्रारीवर तात्काळ गुन्हा दाखल होतो की केवळ चौकशीच्या फेऱ्यात प्रकरण अडकते, यावरून प्रशासनाची भूमिका स्पष्ट होणार आहे.
जर पत्रकारांवर दबाव टाकण्यासाठी खोट्या तक्रारींचा मार्ग अवलंबला जात असेल, तर तो लोकशाहीसाठी अत्यंत धोकादायक संकेत आहे. प्रशासनाने वेळेत हस्तक्षेप करून सत्य बाहेर आणणे आणि पत्रकारांच्या अधिकारांचे संरक्षण करणे ही काळाची गरज आहे.

युवा आदर्श

**अधिकार ...**

**माहितीचा अधिकार**
**न्याय रूपात सुविधा**
**सत्य कथन करतात**
**असता शंका दुविधा**
**सशक्त प्रशासनास्तव**
**सक्षम मदती कायदा**
**स्पटिका सम सत्यता**
**करतो नक्की वायदा**
**सामान्य नागरिकांस**
**अद्भुत अमोलसंपदा**
**गुड गव्हर्नन्स संबधि**
**जणूही खुली निविदा**
**नियमांच्या चौकटीत**
**करतो माहिती वादा**
**प्रक्रिया संपूर्ण करुन**
**सादर करतो मसुदा**
**अधिकार जाणायचा**
**किंमत मोठी कागदा**
**प्रस्तुत होईलं सगळे**
**पाळून सकलमर्यादा**
**गैर वापर करणा-या**
**मात्र मिळेलं मलिदा**
**जपून राहणे जरूरीचे**
**घेऊ शके गैरफायदा**

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

झाडे लावा
झाडे जगवा

### विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र यांची जालना जिल्ह्याची वार्षिक तपासणी

# परेड, किट तपासणी, दंगा काबू प्रात्यक्षिक, बिट मार्शल पेट्रोलिंग योजनेचे उदघाटन

**जालना । प्रतिनिधी** - छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र यांनी आज बुधवार, दि. ५ फेब्रुवारी २०२६ रोजी जालना जिल्हा पोलीस दलाची सन २०२५२०२६ या कालावधीतील वार्षिक तपासणी केली. या तपासणीदरम्यान जिल्ह्यातील पोलीस प्रशासनाची कार्यपद्धती, सज्जता, शिस्त, साधनसामग्री, मनुष्यबळ व लोकाभिमुख पोलिसींग यांचा सखोल आढावा घेण्यात आला.
विशेष पोलीस महानिरीक्षक श्री. मिश्र हे सकाळी जालना पोलीस मुख्यालयात दाखल झाले. पोलीस मुख्यालयातील कवायत मैदानावर आयोजित सिरोमनियल परेडमध्ये त्यांनी उपस्थिती दर्शविली. यावेळी पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बंसल यांनी त्यांना मानवंदना दिली. त्यानंतर मा. मिश्र यांनी परेडचे निरीक्षण केले, किट परेड घेतली तसेच दंगा काबू पथकाचे प्रात्यक्षिक पाहून जवानांच्या प्रशिक्षण व तयारीची तपासणी केली.

**पोलीस कल्याणासाठी सुविधा विश्रांती कक्षाचे उदघाटन**

जालना पोलीस कल्याण विभागाच्या वतीने वरिष्ठ अधिकारी यांच्यासाठी बांधण्यात आलेल्या विश्रांती कक्षाचे उद्घाटन मा. विशेष पोलीस महानिरीक्षक यांच्या हस्ते करण्यात आले. पोलीस दलाच्या मनुष्यबळाला आवश्यक असलेल्या मूलभूत सुविधा वाढविण्यावर भर देण्यात येत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.
तसेच एस.आर.जे. स्टील कंपनीचे श्री. सुरेंद्र पित्ती यांच्याकडून जालना पोलीस दलासाठी देण्यात आलेले १०० लोखंडी बॅरिकेड्स शहर वाहतूक शाखा व जिल्हा वाहतूक शाखेला वितरित करण्यात आले. या बॅरिकेड्समुळे वाहतूक नियंत्रण तसेच कायदा-सुव्यवस्थेच्या कामकाजास अधिक बळ मिळणार आहे.

**अत्याधुनिक सर्व्हेलन्स वाहनांचे उदघाटन**

जालना पोलीस दलासाठी पुरविण्यात आलेल्या दोन अत्याधुनिक सर्व्हेलन्स वाहनांचे उद्घाटनही मा. मिश्र यांच्या हस्ते करण्यात आले. या वाहनांमध्ये उच्च दर्जाचे सीसीटीव्ही कॅमेरे, फ्लड लाईट प्रणाली, लाईव्ह मॉनिटरिंग, पब्लिक अ‍ॅड्रेस सिस्टम तसेच लाईव्ह स्ट्रिमिंगची सुविधा उपलब्ध आहे. गुन्हेगारी नियंत्रण, जमाव व्यवस्थापन व मोठ्या कार्यक्रमांदरम्यान या वाहनांचा प्रभावी वापर होणार आहे.

**शहर बिट मार्शल पेट्रोलिंग योजनेचा शुभारंभ**

जालना शहरात गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी, परिसरात सातत्याने पोलिसींग सुनिश्चित करण्यासाठी तसेच नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना वाढविण्यासाठी शहर बिट मार्शल पेट्रोलिंग योजना मा. विशेष पोलीस महानिरीक्षक यांच्या हस्ते सुरू करण्यात आली. या योजनेअंतर्गत एकूण १० मोटारसायकलवर २० पोलीस अमंलदार दिवस-रात्र पेट्रोलिंग करणार असून, संवेदनशील भागांमध्ये विशेष लक्ष देण्यात येणार आहे.

**विविध विभागांची पाहणी व सैनिक संमेलन** श्री मिश्र यांनी पोलीस मुख्यालय जालना तसेच मोटार परिवहन विभाग जालना येथे भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली. त्यानंतर सर्व पोलीस अधिकारी, पोलीस अमंलदार, मंत्रालयीन अधिकारी व कर्मचारी यांच्या अडीअडचणी, समस्या व सूचना जाणून घेण्यासाठी सैनिक



संमेलन घेतले. यावेळी त्यांनी शिस्त, प्रामाणिकपणा, जनतेशी सौहार्दपूर्ण वर्तन आणि कायद्याची प्रभावी अंमलबजावणी यावर भर दिला.
या वार्षिक तपासणीदरम्यान पोलीस अधीक्षक अजयकुमार बंसल, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, प्रशिक्षणार्थी सहाय्यक पोलीस अधीक्षक श्रीमती जान्हवी शेखर, जिल्ह्यातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी तसेच सर्व शाखा प्रमुख उपस्थित होते. विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र यांच्या वार्षिक तपासणीमुळे जालना जिल्हा पोलीस दलाच्या कार्यक्षमतेला चालना मिळणार असून, आधुनिक साधनसामग्री, प्रभावी पेट्रोलिंग व लोकाभिमुख पोलिसींगच्या माध्यमातून जिल्ह्यातील कायदा-सुव्यवस्था अधिक भक्कम होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# जालन्यात मतदान यादीच्या कामात दिरंगाई; केंद्रस्तरीय अधिकाऱ्याला कारणे दाखवा नोटीस

**जालना । प्रतिनिधी** -
विधानसभा मतदारसंघातील मतदान यादी अद्ययावत करण्याच्या कामात हलगर्जीपणा व दिरंगाई केल्याप्रकरणी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसीलदार, जालना विधानसभा मतदारसंघ यांच्या वतीने ही नोटीस देण्यात आली आहे.
निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदान यादी अद्ययावत ठेवण्यासाठी ई-रोनेट २.० प्रणालीवर नोंदी करणे, , , -६, -७, -८ तसेच मतदार यादीतील अस्पष्ट, आकारविरहित व मानव नसलेल्या (, -, -) छायाचित्रांची पडताळणी करणे



आवश्यक आहे. मात्र संबंधित अधिकारी यांनी या जबाबदाऱ्या वेळेत पूर्ण न केल्याचे नोटीसमध्ये नमूद करण्यात आले आहे.
तसेच सदर अधिकाऱ्यांनी अद्याप ई-रोनेट २.० प्रणालीवर आवश्यक नोंदी न केल्याने निवडणूक कामकाजात अडथळा निर्माण होत असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.
या निष्काळजीपणामुळे लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ च्या कलम ३२ अंतर्गत कारवाई प्रस्तावित करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.
या नोटीस मिळाल्यापासून २४ तासांच्या आत लेखी खुलासा सादर करण्याचे आदेश देण्यात आले असून, खुलासा न दिल्यास पुढील कडक कारवाई करण्यात येईल, असे नोटीसमध्ये स्पष्ट करण्यात आले आहे.
या कारवाईमुळे निवडणूक कामकाजात शिस्त राखण्याचा प्रशासनाचा निर्धार पुन्हा एकदा अधोरेखित झाला आहे.

# परीक्षा कॉपीमुक्त व शिस्तबद्ध पार पाडण्याबाबत कडक निर्बंध

**जालना । प्रतिनिधी** - महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या इयत्ता १० वी ची परीक्षा एकुण १०२ परीक्षा उपकेंद्रावर व इयत्ता १२ वीची परीक्षा एकुण ७९ परीक्षा उपकेंद्रावर दि. १० फेब्रुवारी, २०२६ ते १८ मार्च, २०२६ या कालावधीत जालना जिल्ह्यात पार पडणार आहेत. या परीक्षा पूर्णतः कॉपीमुक्त, पारदर्शक व शांततेच्या वातावरणात पार पडाव्यात, यासाठी शासन व प्रशासनामार्फत कडक प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यात येत आहेत.
त्याअनुषंगाने, परीक्षा कालावधीत भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३लागू करण्यात आले असून, परीक्षा केंद्रांच्या परिसरात जमावबंदी, अनधिकृत प्रवेश, गैरवर्तन तसेच शांतता भंग करणाऱ्या कोणत्याही प्रकारास सक्त मनाई करण्यात आली आहे. परीक्षा प्रक्रियेत कोणताही परीक्षार्थी, पालक, बाह्य व्यक्ती, खाजगी एजंट किंवा केंद्राशी संबंधित कर्मचारी जर कॉपी, नकल, मोबाईल फोनचा वापर, बनावट ओळखपत्र, प्रश्नपत्रिका फोडणे किंवा अन्य कोणत्याही प्रकारच्या गैरप्रकारात सहभागी आढळून आल्यास, त्यांच्यावर गैरप्रकार करणाऱ्या व्यक्तींविरोधात भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १२६ तसेच महाराष्ट्र सार्वजनिक परीक्षा पान २ वर

संपादकीय पान

# गानकोकिळा

आपल्या मंजुळ आवाजाने संपूर्ण जगाला मोहिनी घालणारी भारताची गान कोकिळा भारतरत्न लता मंगेशकर यांचा आज चौथा स्मृतिदिन. लता मंगेशकर यांचा आवाज म्हणजे जगातील आठवे आश्चर्य होते. त्यांचा आवाज म्हणजे रसिकांसाठी मोठी पर्वणीच होती. लता मंगेशकर यांचा जन्म २८ सप्टेंबर १९२९ रोजी इंदूर येथे एका गोमंतकीय कुटुंबात झाला. लता दिदींना गायनाचा वारसा त्यांच्या वडिलांकडून मिळाला. त्यांचे वडील मास्टर दीनानाथ मंगेशकर हे शास्त्रीय गायक आणि नाट्य अभिनेते होते. त्यांच्या वडिलांकडूनच त्यांनी गायनाचे धडे गिरवले. तेच त्यांचे गायनातील पहिले गुरू होते. लता दिदींना लहानपणी हेमा नावाने हाक मारली जायची पण मास्टर दीनानाथ यांच्या एका नाटकातील नाव लतिका असे होते या नावावरूनच त्यांनी त्यांचे नाव लता असे ठेवले. हेच नाव आज जगातील आठवे आश्चर्य ठरले. आपल्या वडिलांच्या संगीत नाट्यात त्यांनी वयाच्या पाचव्या वर्षी काम केले. वयाच्या तेराव्या वर्षी लता दीदींनी गायन क्षेत्रात पाऊल ठेवले आणि १९४२ साली त्यांनी आपले पहिले गाणे रेकॉर्ड केले. किती हसाल ? या चित्रपटातील नाचू या गडे खेळू सारे..... हे गाणे त्यांनी गायले मात्र या गाण्याचा चित्रपटात समावेश झाला नाही. त्याचवर्षी मंगळागौर या चित्रपटात नटली चैत्राची नवलाई.... हे गाणे गायले. या चित्रपटात त्यांनी छोटीशी भूमिकाही केली होती. त्यानंतर त्यांनी काही मराठी चित्रपटात गाणी गायली. लता दिदींचे खूप गाजलेले पहिले गाणे म्हणजे १९४९ सालच्या महल चित्रपटातील खेमचंद प्रकाश या संगीतकाराने स्वरबद्ध केलेले आयेगा आनेवाला.... हे गाणे इतके लोकप्रिय झाले की त्यांच्याकडे संगीतकरांची रांग लागली. त्यांनी गायलेली गाणी लोकप्रिय होऊ लागली. १९५० नंतर दिदींचा उत्कर्षाचा काळ सुरू झाला. त्या काळातील नौशाद, सज्जाद, वसंत देसाई, दत्ता डावजेकर यासारखे जुने आणि त्या काळात उदयाला येणारे एस डी बर्मन, सी रामचंद्र, शंकर - जयकिशन, मदन - मोहन, उषा खन्ना, कल्याणजी - आनंदजी, रवी, लक्ष्मीकांत - प्यारेलाल, आर डी बर्मन अशा सर्वच संगीतकारांकडे दीदी गाऊ लागल्या. या सगळ्यांकडे गायलेल्या दिदींच्या गाण्याला अमाप लोकप्रियता मिळत गेली. त्यांच्या आवाजाने रसिक तृप्त होत गेले. १९६२ साली चीनने भारतावर आक्रमण केले. त्या युद्धात भारताचे शेकडो जवान धारातीर्थी पडले. या शहीद जवानांना श्रद्धांजली वाहण्यासाठी २७ जून १९६३ रोजी दिल्लीत एक समारंभ आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी एक खास गीत कवी प्रदीप यांनी लिहिले आणि सी. रामचंद्र यांनी संगीतबद्ध केले होते. ते गीत लता दीदींनी गायले. ते गीत आजही लोकप्रिय असलेले ये मेरे वतन के लोगो....... हे गीत ऐकून तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांना आपले आश्रू आवरता आले नाही. मराठीतही दीदींनी असंख्य गाणी गायली. आनंदघन या नावाने दीदींनी काही चित्रपटांना संगीतही दिले. जवळपास सात दशके आपल्या मंजुळ आवाजाने रसिकांना मंत्रमुग्ध करणाऱ्या लता दीदींनी जवळपास एक हजार चित्रपटातून ३० हजारांहून अधिक गाणी गायली. मराठी, हिंदीसह २० हुन अधिक प्रादेशिक भाषेत त्यांनी गाणी गायली. मधुबाला, नूतन, मीना कुमारी पासून श्रीदेवी, माधुरी, जुही ते काजोल, करिश्मा, करीना कपूरपर्यंत सर्व अभिनेत्रींना त्यांनी आवाज दिला. त्यांच्या गायन कलेची दखल घेऊन सरकारने त्यांना अनेक मानाचे पुरस्कार दिले. १९६९ साली भारत सरकारने त्यांना देशाचा सर्वोच्च तिसरा नागरी पुरस्कार पद्मभूषण देऊन गौरवले. १९९९ साली देशाचा सर्वोच्च दुसरा नागरी पुरस्कार पद्मविभूषणने गौरविण्यात आले. २००१ मध्ये त्यांना त्यांच्या संगीत क्षेत्रातील योगदानाबद्दल भारतरत्न या सर्वोच्च नागरी पुरस्काराने गौरविण्यात आले. एम एस सुब्बालक्ष्मी नंतर या पुरस्काराने गौरविण्यात आलेल्या त्या केवळ दुसऱ्या गायिका होत्या. त्यांना दादासाहेब फाळके हा चित्रपट सृष्टीतील सर्वोच्च पुरस्कार देखील मिळाला आहे. फ्रांस सरकारने ऑफिसर ऑफ लिजन ऑफ ऑनर या त्यांच्या सर्वोच्च नागरी पुरस्काराने त्यांना गौरविले आहे. लता दिदींना तीन वेळा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला तर चार वेळा फिल्मफेअरचा पुरस्कार मिळाला. फिल्मफेअर कडून त्यांचा दोनदा विशेष सन्मान करण्यात आला. कालांतराने त्यांनी नवीन गायकांना पुरस्कार मिळावा या हेतूने पुरस्कार स्वीकारणेच सोडून दिले. १९९२ साली महाराष्ट्र राज्य सरकारने लता मंगेशकर यांच्या नावाने पुरस्काराची सुरवात केली तर मध्यप्रदेश सरकारने १९८४ सालापासूनच लता मंगेशकर पुरस्कार देण्याची परंपरा सुरू केली. लता दिदींना अनेक विद्यापीठांनी मानाची डिलीट पदवी देऊन गौरविले. ६ फेब्रुवारी २०२२ रोजी वयाच्या ९२ व्या वर्षी वृद्धपकाळाने त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने संपूर्ण देश स्तब्ध झाला. त्यांच्या निधनाने केवळ भारतातच नव्हे तर जगभर हळहळ व्यक्त केली गेली. त्यांच्या निधनाने एका दैवी युगाचा अंत झाला असे मानलं गेले. लता दिदींशीवाय भारतीय चित्रपट सृष्टीचा आणि संगीत कलेचा इतिहास पूर्ण होऊ शकत नाही. आपल्या अलौकिक स्वरांनी चित्रपट सृष्टीवरच नव्हे तर संपूर्ण देशावर वेगळा ठसा उमटवणाऱ्या लता दिदींचे संगीत क्षेत्रातले योगदान पुढील १०० पिढ्यांना विसरता येणार नाही. जगभरातील कोट्यवधी संगीत प्रेमींच्या कानाला तृप्त करणारा दैवी स्वर हरपला असला तरी त्यांच्या आवाजाच्या परिसस्पर्शाने अजरामर झालेल्या गीतांच्या माध्यमातून हा स्वर अनंतकाळ आपल्या मनामध्ये गुंजन करत राहणार आहे. दैवी स्वरांची देणगी लाभलेल्या गान कोकिळा भारतरत्न लता मंगेशकर यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

**पान १ वरुन**

## परिक्षा कॉपीमुक्त ...

(गैरप्रकार प्रतिबंध) अधिनियम, १९८२ चे कलम ७ अन्वये थेट गुन्हे दाखल करुन कठोर कारवाई करण्याचे आदेश संबंधित यंत्रणांना देण्यात आलेले आहेत. परीक्षा काळात जालना जिल्ह्यातील सर्व परीक्षा केंद्रांवर अत्याधुनिक सी.सी.टी.व्ही. कॅमेरे कार्यान्वित करण्यात आले असून, परिक्षा केंद्रातील प्रत्येक हॉल मध्ये सी.सी.टी.व्ही बसविण्यात आलेले आहे. प्रत्येक परीक्षा केंद्र परीसरामध्ये ड्रोनद्वारे टेहाळणी देखील करण्यात येणार आहे. प्रशासनामार्फत सर्व परीक्षा उपकेंद्रावर बैठे पथक व भरारी पथक नेमण्यात आलेले आहे. तसेच पोलीस यंत्रणा, शिक्षण विभाग यांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. विद्यार्थ्यांनी प्रामाणिकपणे परीक्षा द्यावी, तसेच पालक व नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हादंडाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले आहे.

### मुंबईत २७ व २८ मार्च रोजी वैद्यकीय परिषद पल्स चे आयोजन

# पल्स परिषदेच्या माध्यमातून वैद्यकीय वेलनेस पर्यटनाचा महाराष्ट्र ब्रँड निर्माण करा -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई । प्रतिनिधी -** वैद्यकीय क्षेत्रात जागतिक स्तरावर महाराष्ट्राला ओळख निर्माण करून देणाऱ्या पल्स या वैद्यकीय परिषदेचे आयोजन मुंबईत जिओ वर्ल्ड सेंटर, येथे २७ व २८ मार्च २०२६ रोजी करण्यात येणार आहे. या परिषदेत देशातून आणि जगभरातून वैद्यक क्षेत्रातील २९०० पेक्षा जास्त तज्ज्ञ, अभ्यासक आणि मान्यवर सहभागी होणार आहेत.

पल्स वैद्यकीय परिषदेचे भव्य दिव्य आयोजन करून परिषदेच्या माध्यमातून वेलनेस उपचारांचा वैद्यकीय पर्यटनातील महाराष्ट्र ब्रँड निर्माण करावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वर्षा निवासस्थानी परिषद आयोजनाच्या आढावा बैठकीत दिले. यावेळी वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री माधुरी मिसाळ उपस्थित होत्या.

पारंपरिक खर्चिक असलेल्या वैद्यकीय उपचाराऐवजी वेलनेस उपचारांकडे नागरिकांचा ओढा वाढत आहे. वेलनेस उपचार पद्धतीत राज्यात मोठ्या प्रमाणावर वाव आहे. त्यामुळे आयुषमधील उपचार पद्धतींना वेलनेस कडे वळविण्यात यावे, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, वैद्यकीय क्षेत्रामध्ये अनेक स्टार्टअप कार्यरत आहेत. अधिकाधिक स्टार्टअपला परिषदेत सहभागी करून घ्यावे. जेणेकरून परिषदेमध्ये या क्षेत्रात होणाऱ्या नवनवीन संशोधनावर आधारित चर्चांमधून कर्करोगासारख्या आजारांवर सहज, सोपी आणि परवडणारी उपचार पद्धती विकसित करण्यात स्टार्टअपला मदत होईल.वैद्यकीय क्षेत्रातील जागतिक गुंतवणूकदार या परिषदेत सहभागी होतील याबाबत दक्षता घ्यावी, त्यांच्या माध्यमातून राज्यात होत असलेल्या बल्क ड्रग पार्क मध्ये गुंतवणूक होईल, यासाठी प्रयत्न करावे. परिषदेच्या यशस्वी आयोजनासाठी संबंधित विभागांनी नोडल अधिकारी नियुक्त करावेत.

सबंधित विभागांनी समन्वयाने काम करीत परिषदेच्या आयोजनातून राज्याला वैद्यकीय क्षेत्रात मोठा लाभ मिळवून द्यावा, असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिले.

वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री माधुरी मिसाळ म्हणाल्या, ग्रामीण भागात आरोग्य यंत्रणा बळकट होण्यासाठी परिषदेत वैद्यक क्षेत्रातील गुंतवणूकदारांसोबत करार करण्यात यावेत. यामधून ग्रामीण भागात आरोग्याच्या दर्जेदार सुविधा निर्माण होतील. मानसिक आजारांवरील नवनवीन उपचार पद्धती, वैद्यकीय पर्यटन विकसित होण्यासाठी परिषदेच्या संधीचा उपयोग करण्यात यावा. बैठकीस मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणचे महानगर आयुक्त डॉ.संजय मुखर्जी, पर्यटन विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह, वैद्यकीय शिक्षण आयुक्त अनिल भंडारी, अन्न व औषध प्रशासन आयुक्त श्रीधर दुबे, मुख्य राजशिष्टाचार अधिकारी राजेश गवांदे, मुख्यमंत्री यांच्या सल्लागार पूजा मिसाळ, आदी उपस्थित होते.

**अशी असणार परिषद**

-परिषदेचे उद्घाटन २७ मार्च रोजी होईल.

-परिषदेत प्लेनरी, ३६० डिग्री डोम, आदींसह स्टार्टअपसाठी वेगळी दालने असणार आहेत. -तसेच उद्योग क्षेत्रातील नवनवीन संशोधनाची माहिती असणारी दालने असणार आहेत.

-परिषदेत जागतिक आरोग्य संघटना, युनेस्को यांचे उच्चपदस्थ अधिकारी सहभागी होतील.

-जगातील नामांकित वैद्यकीय शिक्षण देणाऱ्या विद्यापीठांचे कुलगुरू आणि संशोधकही परिषदेत सहभाग घेणार आहेत. -भविष्यातील वैद्यकीय शिक्षण, डिजिटल हेल्थ आणि कृत्रिम बुद्धिमत्ता, उपचार पद्धतीतील संशोधन या विषयांवर पॅनल चर्चा, कार्यशाळा आणि केस स्टडीज होणार आहेत.

-तसेच प्रदर्शन, राऊंड टेबल चर्चा, टेक टॉक असणार आहे.

# निरोगी तोंड, निरोगी शरीर : दर सहा महिन्यांनी दातांची तपासणी करणे आवश्यक

### जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. जयश्री भुसारे यांचे आवाहन; जिल्हा परिषदेतर्फे मौखिक आरोग्य दिन साजरा

**जालना । प्रतिनिधी -** ''दात, हिरड्या आणि तोंडाचे आरोग्य ही मानवी आरोग्याची पहिली पायरी आहे. सध्याच्या धकाधकीच्या जीवनात चुकीचा आहार आणि व्यसनांमुळे मुखरोगांचे प्रमाण वाढत आहे. हे टाळण्यासाठी प्रत्येकाने दर सहा महिन्यांतून एकदा तज्ज्ञ डॉक्टरांकडून आपल्या तोंडाची आणि दातांची तपासणी करून घेणे गरजेचे आहे,'' असे प्रतिपादन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. जयश्री भुसारे यांनी केले.

५ फेब्रुवारी या जागतिक मौखिक आरोग्य दिना निमित्त जनतेमध्ये जनजागृती करण्यासाठी आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावर्षी निरोगी तोंड-निरोगी शरीर हा संदेश तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचवण्यावर भर दिला जात आहे.

व्यसनांपासून दूर राहण्याचा सल्ला

आजकल तंबाखू, गुटखा, सुपारी यांसारख्या पदार्थांच्या सेवनामुळे मुखकर्करोगाच्या ( ) रुग्णांमध्ये मोठी वाढ होत असल्याचे डॉ. भुसारे यांनी अधोरेखित केले. तोंडाची दुर्गंधी, दात किडणे, हिरड्यांचे आजार आणि तोंडात वारंवार होणाऱ्या जखमा ही गंभीर आजाराची लक्षणे असू शकतात. ही लक्षणे टाळण्यासाठी तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन पूर्णपणे थांबवणे हाच एकमेव पर्याय आहे.

आरोग्यदायी सवयींचे पालन करा

मौखिक आरोग्य उत्तम राखण्यासाठी डॉ. भुसारे यांनी खालील महत्त्वाच्या टिप्स दिल्या:

दोनदा स्वच्छता: रोज सकाळी आणि रात्री झोपण्यापूर्वी दात घासणे अनिवार्य आहे.

नियमित तपासणी: दर सहा महिन्यांनी एकदा दंतवैद्यांकडून तपासणी करून घ्यावी.

शासकीय सुविधा: सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये मौखिक आरोग्याची तपासणी आणि उपचार मोफत उपलब्ध आहेत, त्याचा नागरिकांनी लाभ घ्यावा.

''दातांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका. वेळीच केलेली तपासणी तुम्हाला भविष्यातील मोठ्या शस्त्रक्रिया आणि खर्चापासून वाचवू शकते.''



# कॅन्सर : आधार रेखा प्रतिष्ठान

आपल्याला कॅन्सर झाल्याचे कळताच संबधित व्यक्ति प्रचंड घाबरून जाते. त्या व्यक्तिच्या घरची मंडळी देखील हवालदिल होऊन जाते. डॉक्टरांचे उपाय, रुग्णालयात उपचार करण्यात येतात. तेथील सर्व स्टाफ त्यांची ड्युटी बजावीत असतो.पण अशा या भयंकर परिस्थितीत महत्वाचे असते, ते म्हणजे रुग्ण आणि त्याच्या नातेवाईकांचे मनोबल कायम ठेवणे,ते वाढविणे हे होय.

ही गरज ओळखून कॅन्सर रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक यांच्यासाठी ''आधार रेखा प्रतिष्ठान'' ही संस्था ठाण्यात स्थापन करण्यात आली आहे.

या संस्थेतर्फे पुढील उपक्रम चालवले जातात

१. कर्करुग्णांसाठी मोफत टॅक्सी सेवा- ठाणे ते टाटा हॉस्पिटल परळ व खारघर. ही योजना जानेवारी २०२१ पासून चालू आहे आत्तापर्यंत अठराशेहून अधिक वेळा कर्करुग्णांना यांचा फायदा झाला आहे.

२. कर्क रुग्णांसाठी खास योग वर्ग - घंटाळी मित्र मंडळाच्या सहकार्याने , सहयोग मंदिर घंटाळी जवळ योग वर्ग चालू आहेत. २५ ते ३० जण याचा लाभ घेतात

३. दर बुधवारी कर्क योध्यांसाठी कर्कमैत्र या नावाने कार्यक्रम आयोजित केला जातो. यामध्ये विविध तज्ञांची व्याख्याने, विविध छंदांची जोपासना, याशिवाय वर्षभरात एकत्र नाटक, सिनेमा पाहणे, सहभोजन, सहलीला जाणे यासारख्या विविध कार्यक्रमांची रेलचेल असते.

४. आधार रेखा प्रतिष्ठानची स्वतःची लायब्ररी असून यामध्ये आरोग्य विषयक १०० ते १५० पुस्तके उपलब्ध आहेत.

५. आधार रेखा प्रतिष्ठान तर्फे कॅन्सर डिटेक्शन कॅम्पस नियमितपणे घेतले जातात

६. आधार रेखा प्रतिष्ठान तर्फे २२ सप्टेंबर कर्क योध्यांसाठी, त्यांचे मनोधैर्य वाढवण्यासाठी रोझ डे साजरा होतो. गुलाब पुष्प देऊन या रुग्णांचा सत्कार केला जातो.

७. आधार रेखा प्रतिष्ठानचे संस्थापक अरविंद जोशी यांच्या स्मृती प्रित्यर्थ नोव्हेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात अरविंद स्मृती व्याख्यानमाला होते. त्यामध्ये अनेक नामवंत येऊन आरोग्य विषयक भाषण देतात. गेल्या काही वर्षात उदय निरगुडकर, शरद पोंक्षे , वंदना अत्रे, डॉ अभिजीत सोनवणे, डॉ अंजली जोशी, डॉ राजेंद्र बडवे यांच्यासारखे नामवंत तज्ञ आले होते.

८. गरजू कर्करुग्णांना आर्थिक मदत केली जाते.

९. कर्करूग्ण व त्यांचे कुटुंबीय यांच्यासाठी, मानसिक उपचार तज्ञांची ,मदत देवुन आधार संवाद मार्फत समुपदेशन केले जाते. कै डॉ.एच एस भानुशाली , डॉक्टर अनिल हेरूर ,डॉक्टर अमोल भानुषाली आणि श्री श्रीनिवास मराठे, रश्मी जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली आधार रेखा प्रतिष्ठानचे कार्य सुरळीत चालू आहे

भविष्यात विस्ताराच्या काही योजना या संस्थेच्या आहेत. जसे की संस्थेला स्वतः साठी स्वतंत्र जागा मिळणे. कारण सध्या प्रत्येक उपक्रम हा विविध ठिकाणी घेतला जातो . कर्करुग्णांना औषधे व विविध प्रकारच्या लसी स्वस्तामध्ये उपलब्ध करून देण्याचा जसे कर्करुग्ण, कर्क योद्धे व कुटुंबीयांसाठी समुपदेशन आणि नऊ ते १४ वर्षाच्या मुलींसाठी याशिवाय नजीकच्या भविष्यात ठाणे शहर वा आसपास ,एक चालू करण्याचा मनोदय आहे. या सगळ्यासाठी व्यक्तींचा व संस्थांचा पाठिंबा असणे आवश्यक आहे.

आधार रेखा प्रतिष्ठान ठाणे ही कर्करुग्णांसाठी कार्यरत धर्मादाय आयुक्तांकडे नोंदलेली संस्था आहे.संस्थेला ८० व मिळाला आहे. त्यामुळे या संस्थेला दिलेल्या देणग्या करमुक्त आहेत . दिवसेंदिवस कॅन्सर चे रुग्ण वाढत आहेत. कॅन्सर चे प्रकार ही वाढतच चालले आहेत. ही गंभीर परिस्थिति लक्षात घेता, ठिकठिकाणी आधार रेखा निर्माण होण्याची नितांत गरज आहे. चला तर मग या महान कार्यात आपण ही सहभागी होऊ या!

**लेखनःशुभांगी पासेबंद ठाणे.**

**संपादनः देवेंद्र भुजबळ -९८६९४८४८००**

# सौ. जमुनाबाई शिवरतन बगडिया ट्रस्टतर्फे ८ मार्च रोजी ११ मुलींचा सामूहिक विवाह

**जालना । प्रतिनिधी -** सौ. जमुनाबाई शिवरतन बगडिया चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष तथा उद्योजक पन्नालाल बगडिया यांच्या पुढाकारातून सलग दुसऱ्यावर्षी जालना जनसेवा ग्रुपच्यावतीने सामाजिक बांधिलकीची अद्भुत प्रेरणा देत ११ मुलींच्या सामूहिक विवाह सोहळ्याचे येत्या ८ मार्च महिला दिवस रोजी आयोजन करण्यात आले आहे. या विवाह सोहळ्यात नवविवाहित जोडप्यांना संसार उपयोगी सर्व साहित्य प्रदान करून त्यांच्या संसाराचा आरंभ सुकर करण्याचा उद्देश ठेवण्यात आला आहे.

सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण घालून देत जालना जनसेवा ग्रुपच्यावतीने पन्नालाल बगडिया यांच्या संकल्पनेतून गतवर्षीपासून आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील मुलींचे सामूहिक विवाह लावून देण्याचा स्तुत्य उपक्रम राबविला जात आहे. गतवर्षी ११ मुलींचे विवाह लावण्याचा संकल्प करण्यात आला होता. मात्र, ७ एवढीच नोंदणी झाल्याने ७ मुलींचे सामूहिक विवाह लावून देण्यात आले होते. यंदाही ११ मुलींचे सामूहिक विवाह लावण्याचा संकल्प करण्यात आला असून, हा आदर्श विवाह सोहळा ८ मार्च रोजी आयोजित करण्यात आला आहे. या उपक्रमाद्वारे समाजात सकारात्मक संदेश देण्याचा जनसेवा ग्रुपचा मानस असल्याची माहिती ग्रुपचे अध्यक्ष पुरुषोत्तम मोतीवाला यांनी दिली.

नवविवाहित दांपत्यांना संसार उपयोगी साहित्य भेट दिले जाणार आहे. वयाची १८ वर्ष पूर्ण झालेल्या नवदांपत्यांनाच नाव नोंदणी करता येईल. ग्रुपकडे २० फेब्रुवारीपर्यंत नोंदणी करणे आवश्यक आहे. प्राप्त होणाऱ्या अर्जानंतर कुटुंबाचा सर्वे करून आर्थिक परिस्थितीचे अवलोकन केले जाईल. गरजू असल्याची खात्री पटल्यानंतरच सामूहिक विवाहासाठी निवड केली जाईल.

अधिक माहिती आणि नाव नोंदणीसाठी पालकांनी पुरुषोत्तम मोतीवाला, नरेश गुप्ता, डॉ. रामनारायण जैस्वाल, गोवर्धन अग्रवाल, पन्नालाल बगडिया, अ‍ॅड. आनंद झा, श्रेनिक नानावटी, गणेश अग्रवाल, सुदेश करवा, विमलराज सिंघवी, सुरेंद्र चेचाणी, अनिल सोनी, सतीश राठी, सूर्यनारायण गजबी, संजय बाहेती, निखिल तायल, अरुण लाहोटी यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जालना जनसेवा ग्रुप व जमुनाबाई शिवरतन बगडिया चारिटेबल ट्रस्टच्यावतीने करण्यात आले.

# जालना जिल्ह्यातील दलित आदिवासी शिवसेनेच्या पाठीशी

## शिवसेना दलित आघाडीचे जिल्हाप्रमुख ॲड. भास्कर मगरे

**जालना । प्रतिनिधी -** शिवसेना दलित आघाडीच्या वतीने दलित, आदिवासी उदर निर्वाह ज्वलंत प्रश्नावर अनेक वर्षापासून जनआंदोलनाच्या माध्यमातून रस्त्यावरचा संघर्ष सुरू आहे. काही प्रमाणात आंदोलनाला यश आले आहे,मात्र पूर्ण प्रश्न मार्गी लागलेला नाही. त्यामुळे अजून ही आपण आंदोलनाची भूमिका सोडलेली नसल्याचे शिवसेना दलित आघाडीचे जिल्हाप्रमुख ॲड. भास्करराव मगरे यांनी सांगितले.

शिवसेना- युवासेना, दलित आघाडीच्या वतीने मेळाव्याचे आयोजन ५ जानेवारी २०२६ रोजी जाफराबाद येथे करण्यात आले होते. त्याप्रसंगी बोलताना शिवसेना दलित आघाडीचे जिल्हाप्रमुख ॲड. भास्कर मगरे बोलत होते. यावेळी जाफराबाद शिवसेना तालुकाप्रमुख दत्ता बंगाळे-पाटील, युवा सेना तालुकाप्रमुख बालाजी पवार,शहरप्रमुख फारुख, राजू रमणे, गजानन खंबाट,शिवसेना दलित आघाडी जाफराबाद तालुकाप्रमुख विजय मोरे, आणि प्रदीप जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलतांना मगरे म्हणाले की, जिल्ह्यात बऱ्याच ठिकाणी गायरान ७/१२ वाटप प्रक्रिया सुरू आहे आणि म्हणून भुमिहिनांचे प्रश्नासोबतच जालना जिल्ह्यात दलित आदिवासी भूमिहीन लाभार्थ्यांना शासनाने




प्रदान केलेल्या गायराण जमिनी,इनामी जमिनी आणि सीलिंग ॲक्टमधील जमिनी २०१५-१६ मध्ये संगणकीय ७/१२ वरून लाभार्थ्यांचे नांव समोरील क्षेत्र पोट खराबीमध्ये दाखवत असल्याने लाभार्थ्यांना शासकीय मदतीशिवाय बँकेच्या कर्जापासून वंचित राहावे लागत आहे. त्यामध्ये दुरुस्ती करून क्षेत्र पुरवत करण्यात यावे. तसेच कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमानी योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करून जिल्ह्यातील दलितांना चार एकर जिरायती आणि दोन एकर बागायती जमीन जास्तीत जास्त लाभार्थ्यांना वाटप करण्यात यावी. तसेच तसेच सर्वांसाठी घरे २०२२-२४ या योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करून जिल्ह्यातील उपेक्षित समाजातील वंचित लाभार्थ्यांना प्राधान्यक्रम देऊन घरे देण्यात यावेत, यामध्ये इंदिरा आवास, रमाई आवास, शबरी घरकुल, प्रधानमंत्री आवास, या घटकात बसणाऱ्या लाभार्थ्यांना जास्तीत जास्त लाभ देण्यात यावा. तसेच निराधार योजनेची प्रभावी अंमलबजावणी करून लाभार्थ्यांना मासिक अनुदान महिनेवारी देऊन त्यामध्ये वाढ करून दीड हजार ऐवजी ३ हजार रुपये देण्यात यावे. यासोबतच शिवसेना दलित आघाडीच्या वतीने जालना जिल्ह्यात शिव संपर्क अभियान गाव-वाडी-तांडा-वस्तीमध्ये जाऊन प्रत्यक्ष लाभार्थ्यांचे विहित नमुन्यातील अर्ज भरून संबंधित योजनेचा लाभ सुद्धा देण्यात शिवसेना दलित आघाडीचे शिव संपर्क अभियान यशस्वी झालेले आहे. तसेच केंद्र शासन व राज्य शासन यांच्या समाज हिताच्या जनकल्याणकारी योजना सुद्धा शिव संपर्क अभियानाच्या माध्यमातून राबविण्यात शिवसेना दलित आघाडीला यश आलेले आहे.

त्यामध्ये सुशिक्षित बेरोजगारांसाठी असलेल्या आर्थिक विकास महामंडळे जसे की महात्मा फुले आर्थिक विकास महामंडळ,लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ,संत रोहिदास चर्मकार विकास महामंडळ, वसंतराव नाईक आर्थिक विकास महामंडळ,ओबीसी आर्थिक विकास महामंडळ, या सर्व योजनांची माहिती गाव स्तरावर देऊन लाभार्थी विहित नमुन्यातील अर्ज भरून घेऊन आर्थिक लाभ मिळवून देण्यात शिवसेना दलित आघाडीचे जालना जिल्हा शिव संपर्क अभियान यशस्वी झाले आहे. आणि म्हणून जिल्ह्यातील दलित आदिवासी हा महत्वाचा घटक शिवसेना दलित आघाडीच्या पाठीशी खंबीरपणे आगामी काळात होऊ घातलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत उभा राहतील असा ठाम विश्वास मगरे यांनी व्यक्त केला.

# डॉल्फिन इंग्लिश स्कूलमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात



**परतूर । प्रतिनिधी -** परतुर तालुक्यातील वाटूर फाटा येथील डॉल्फिन इंग्लिश स्कूलमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरे करण्यात आले.

या कार्यक्रमास मुख्यध्यापक यांच्या हस्ते सरस्वती पूजनाने सुरुवात करण्यात आली होती. यावेळी शाळेतील चिमुकल्यानी आपले कलाविष्कार सादर करत देशभक्तीपर गीत .बालगीत . लावणी सादर करण्यात आल्या. विद्यार्थ्यांनी विविध कला सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली. यावेळी आपल्या चिमुकल्याचा उत्साह वाढवण्यासाठी मोठ्या प्रमाणात पालकांनी गर्दी केली होती. कार्यक्रमाची रूपरेषा श्रीमती पाटील भाग्यश्रीआणि शेळके गजानन यांनी मांडली. तर आभार प्रदर्शन कुकडे मॅडम यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी श्रीमती कुकडे विद्या . सय्यद नसरीन. पाटिल भाग्यश्री. काळे साधना . सरकटे मॅडम . सनईकर त्रिवेणी. शेळके गजानन इत्यादीनी मेहनत घेतली.

# माता रमाई जयंती मिरवणुकीत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे - पाडेवार

**परतूर । प्रतिनिधी -** परतूर शहरात दि.०७/०२/२०२६, शनिवारी त्यागमूर्ती माता रमाई भिमराव आंबेडकर यांची १२८ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येणार असून यानिमित्त माता रमाई यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. या मिरवणुकीत नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष करण पाडेवार,सचिव प्रदीप पहाडे,धम्मपाल खंडागळे, रोहण अंभुरे यांनी केले आहे.

दरवर्षी प्रमाणे या ही वर्षी त्याग मूर्ती माता रमाई भिमराव आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येणार आहे. माता रमाई भिमराव आंबेडकर यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक सायंकाळी ६ वाजता रेल्वे स्टेशन येथून सजवलेल्या रथातून निघणार आहे. सकाळी १० वाजता तहसील कार्यालया समोरील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नियोजित पुतळ्याच्या जागेवर पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण होणार आहे.

तर सायंकाळी ५ वाजता रेल्वे स्टेशन येथून माता रमाई भिमराव आंबेडकर यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक निघणार आहे. ही मिरवणूक रेल्वे स्टेशनमार्गे महादेव मंदिर चौक,मुख्य मार्गाद्वारे तहसील कार्यालय चौक, पोलीस स्टेशन चौक,मलंगशाह चौक,भाजी मंडई तसेच देशपांडे गल्ली मार्गे आंबेडकर नगर येथे मिरवणुकीचा समारोप होणार आहे. तरी परतुर शहरांसह तालुक्यातील ग्रामीण भागातील नागरिकांनी हजारोच्या संख्येने मिरवणुकीत सहभागी व्हावे असे आवाहन जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष करण पाडेवार,सचिव प्रदीप पहाडे, उपाध्यक्ष धम्मपाल खंडागळे,कोषाध्यक्ष : रोहन अंभुरे यांच्यासह स्वप्निल पहाडे ,प्रशांत वाकळे ,प्रवीण प्रधान,सनी गायकवाड , आकाश राक्षे, बाळा पाडेवार, सिध्दार्थ पाणवाले,
विकास वेडेकर ,सिद्धार्थ खंडागळे , कुमार लांडगे,संतोष साळवे,सुनिल पाडेवार,मनोज वंजारे,रुपेश पहाडे विकास पहाडे,विशाल सोनपसारे यांनी केले आहे.

# एस.टी बस आणि जिल्हा परिषद शाळा या दोनच गोष्टी सर्वसामान्यांच्या राहिल्या - विनोद कळंबे

**विशाल देशमुख**

**जाफ्राबाद -** एस.टी बस आणि जिल्हा परिषद शाळा या दोनच गोष्टी सर्वसामान्यांच्या राहिल्या असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे जाफराबाद तालुकाध्यक्ष तथा शिक्षक पतसंस्थेचे मा. चेअरमन विनोद कळंबे यांनी बुधवारी ता.४ केले.निमखेडा खुर्द तालुका जाफराबाद येथील जिल्हा परिषद शाळेच्या वार्षिक स्नेह संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.यावेळी जाफराबाद पंचायत समितीचे विस्तार अधिकारी राम खराडे, अशोक हरकळ, आश्रुबा बुरकुल ,सुनील पवार, सुधीर भोपळे, प्रविण शिंदे, प्रवीण कोरडे,राजू कोरडे,प्रभाकर कोरडे,सुनील गोफणे,पोलिस पाटील लक्ष्मी कोरडे धनंजय आढाव, उत्तमराव राजभोज, शिवाजी कोरडे,भगवान मांटे,नानासाहेब कोरडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना श्री कळंबे यांनी जिल्हा परिषद शाळेचे भौतिक विकासासाठी ग्रामस्थांसह ग्रामपंचायत ने भरून सहकार्य करण्याचे आवाहन केले. यावेळी शाळेच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी गोरी गोरी पान, लुंगी डान्स यासह विविध मराठी हिंदी चित्रपट गीतांवर बहारदार नृत्य सादर करून उपस्थित प्रेक्षकांची दाद मिळवली.



कार्यक्रमाचे सूत्रसंचलन दिपक इंगळे आणि अंजली कोरडे यांनी तर आभार मुख्याध्यापक रमेश साळवे यांनी मानले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संगीता राजभोज यांच्यासह शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांनी परिश्रम घेतले.या कार्यक्रमाला प्रतिसाद देत उपस्थित ग्रामस्थांनी २४ हजार रुपयांच्या बक्षिसाची उधळण केली.



# मराठवाडा शिक्षक संघाने दिल्ली गाजवली! देशभरातील शिक्षकांनी दिल्लीत व्यक्त केल असंतोष!

## कार्यरत शिक्षकांना टीईटी तून वगळणे व जुनी पेंन्शन सह इतर मागण्यांसाठी जंतरमंतर वर आंदोलन!






**विशाल देशमुख**

**जाफ्राबाद -** देशातील सात बलाढ्य शिक्षक संघटनांनी एकत्र देशाच्या राजधानीत जंतरमंतरवर जोरदार आंदोलन केले. कार्यरत शिक्षकांना टीईटी तून वगळण्यात यावे, सर्वांना जुनी पेंन्शन योजना लागू करावी, नवीन शैक्षणिक धोरणातील जनविरोधी भाग वगळावा, शिक्षकांची अशैक्षणिक कामातून सुटका करावी या व इतर मागण्यांसाठी अखील भारतीय शिक्षक संघटना संयुक्त कृती समितीने दिल्ली दणाणून सोडली. अखील भारतीय माध्यमिक शिक्षक संघाचा घटक म्हणून मराठवाडा शिक्षक संघ आंदोलनात सहभागी झाला होता.अखिल भारतीय संयुक्त कृती समिती शिक्षक संघटना () यांनी आज नवी दिल्लीतील जंतर-मंतर येथे यशस्वीपणे एक प्रभावी धरणा आंदोलन आयोजित केले. शिक्षकांच्या चळवळीतील हा एक ऐतिहासिक टप्पा ठरला आहे. शालेय शिक्षण क्षेत्रातील अनेक राष्ट्रीय पातळीवरील शिक्षक संघटना प्रथमच एका समान व्यासपीठावर एकत्र येत, दीर्घकाळ प्रलंबित शिक्षकांच्या प्रश्नांच्या निराकरणासाठी सामूहिक लढ्याची सुरुवात करण्यात आली.

या धरणे आंदोलनाचे अध्यक्षस्थान मान्यवर प्रेसीडियमने भूषविले, मराठवाडा शिक्षक संघाचे असंख्य बहाद्दर लढवय्ये कार्यकर्ते व मराठवाडा शिक्षक संघाचे अध्यक्ष सूर्यकांत विश्वासराव, सरचिटणीस राजकुमार कदम, उपाध्यक्ष ज्ञानोबा वरवट्टे केंद्रीय उपाध्यक्ष या लढ्यात सामील झालेले आहेत. शिवाय श्री सी. एन. भारती (), श्री के. नरसिंहा रेड्डी (), बसवराज गुरिकर () आणि सी. एल. रोज () यांचा समावेश होता. या कार्यक्रमाला खासदार जॉन ब्रिटास (() फ्लोअर लीडर), सेल्वराज (), व्ही. शिवदासन (()), कुमार नाईक (काँग्रेस) आणि राजा राम सिंह (()) यांच्यासह अनेक मान्यवर नेते उपस्थित होते. त्यांनी आंदोलनाला पाठिंबा जाहीर केला आणि शिक्षकांचे प्रश्न संसदेत मांडण्याचे आश्वासन दिले. याशिवाय चे राष्ट्रीय नेते के. नारायण; आंध्र प्रदेशातील शिक्षक गोपी मूर्ती व तेलंगणातील श्रीपाल रेड्डी; कृषी कामगार संघटनेचे महासचिव बी. वेंकट; स्टीयरिंग कमिटी सदस्य चावा रवि (), सदानंदम गौड (), कमला कांत त्रिपाठी (), राममूर्ती स्वामी (), पी. दामोदर रेड्डी (); वर्ल्ड टीचर्स फेडरेशनचे अध्यक्ष अमियकुमार महंती; चे महासचिव डॉ. अरुण कुमार; चे सचिव प्रा. विकास गुप्ता; च्या सचिव शारदा दीक्षित; चे अध्यक्ष रिजवान आदी मान्यवरांनी सभेला संबोधित केले.

आपल्या प्रभावी भाषणांत वक्त्यांनी च्या स्थापनेला एक मैलाचा दगड ठरवित, विविध शिक्षक संघटनांमध्ये निर्माण झालेल्या ऐक्याचे कौतुक केले.

शिक्षक पात्रता परीक्षा () संदर्भातील प्रश्न आणि सर्वोच्च न्यायालयाच्या अलीकडील निर्णयामुळे देशभरातील शिक्षक समुदाय एकत्र येण्यास मदत झाल्याबद्दल सभेने कृतज्ञता व्यक्त केली. शिक्षणातील गुणवत्ता सुनिश्चित करण्यामागील हेतू मान्य करत असतानाच, शिक्षकांनी या निर्णयाचे कठोर परिणाम तीव्र शब्दांत निषेध केले. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार इयत्ता ते साठी कार्यरत असलेले आणि सेवानिवृत्तीला पाच वर्षांपेक्षा अधिक कालावधी शिल्लक असलेले शिक्षकांनी दोन वर्षांच्या आत उत्तीर्ण करणे बंधनकारक आहे; अन्यथा त्यांना सेवेतून काढून टाकण्याची कारवाई होऊ शकते. मात्र सेवानिवृत्तीला पाच वर्षे किंवा त्यापेक्षा कमी कालावधी शिल्लक असलेल्या शिक्षकांना सेवेत राहण्यासाठी मधून सूट देण्यात आली आहे, परंतु पात्रता नसल्यास पदोन्नती मिळणार नाही. हा निर्णय २३.०८.२०१० रोजीच्या अधिसूचनेला विरोधात आहे. शिक्षणाचा हक्क कायदा () लागू झाल्यानंतर जारी केलेल्या या अधिसूचनेनुसार केवळ त्या तारखेनंतर नियुक्त झालेल्या शिक्षकांसाठीच बंधनकारक होते आणि सर्व कार्यरत शिक्षकांना सूट देण्यात आली होती. राज्य सरकारांनीही त्यानुसार अंमलबजावणी केली होती आणि गेल्या १५ वर्षांपासून कार्यरत शिक्षकांना द्यावी लागलेली नव्हती. सर्वोच्च न्यायालयासमोर ही बाब योग्यरीत्या मांडण्यात अपयशी ठरल्यामुळेच हा प्रतिकूल निर्णय आल्याची टीका संघटनांनी केली.

सभेत काही गंभीर विसंगती अधोरेखित करण्यात आल्याउदा. सूट देण्यासाठी उर्वरित पाच वर्षांची मनमानी अट, तसेच दोन वर्षांत उत्तीर्ण न झाल्यास नोकरी जाण्याची कठोर शिक्षा, जरी एक दिवस जास्त शिल्लक असला तरी.

या पार्श्वभूमीवर संघटनांनी केंद्र सरकारकडे मागणी केली की कार्यरत शिक्षकांचे संरक्षण करण्यासाठी कायद्यात सुधारणा करण्यात यावी आणि सर्वोच्च न्यायालयात पुनर्विचार किंवा क्युरेटिव्ह याचिका दाखल करण्यात यावी.

व्यतिरिक्त, धरणा आंदोलनात पुढील महत्त्वाच्या मागण्यांवरही भर देण्यात आला :

नवीन पेन्शन योजनेविरुद्ध () २२ वर्षांच्या संघर्षानंतर जुनी पेन्शन योजना () पुनर्स्थापित करावी आणि नव्याने आणलेली युनिफाइड पेन्शन स्कीम () रद्द करावी.

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० ( २०२०) मधील लोकविरोधी व खासगीकरणाला चालना देणाऱ्या तरतुदी मागे घ्याव्यात, कारण त्यातून केंद्रीकरण वाढत असून गरीबांसाठी शिक्षण दुर्गम होत आहे.

गेल्या पाच वर्षांत बंद झालेल्या एक लाखांहून अधिक शाळांच्या बंदी व विलीनीकरणास तात्काळ आळा घालावा.

प्राथमिक शिक्षकांना निवडणुकांमध्ये मतदानाचा अधिकार द्यावा.

वेतनधारक कर्मचाऱ्यांवरील उत्पन्नकराचा बोजा कमी करावा.

तात्पुरत्या कर्मचाऱ्यांचे नियमितीकरण करून त्यांना किमान वेतन लागू करावे.

ने केंद्र सरकारकडे या सर्व प्रश्नांचे तातडीने निराकरण करण्यासाठी ठोस पावले उचलण्याची मागणी केली आहे. अन्यथा, या अभूतपूर्व संयुक्त व्यासपीठाला अधिक बळ देऊन आंदोलन आणखी तीव्र करण्याचा निर्धार समितीने व्यक्त केला आहे.

हे संयुक्त व्यासपीठ देशभरातील शिक्षकांचा सामूहिक आवाज आणि दृढ निश्चय दर्शवते. सर्व शिक्षक, शिक्षण कर्मचारी आणि समर्थकांना या संयुक्त आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

अखिल भारतीय संयुक्त कृती समिती व मराठवाडाशिक्षक संघटना चे विश्वासराव, राजकुमार कदम, वरवट्टे सर, जालना जिल्हाध्यक्ष रमेश आंधळे, सचिव संजय येळवते, जिल्हा उपाध्यक्ष जगन राव वाघमोडे, आदींनी केले आहे.

---

### जेईएस युवा जल्लोष २०२६चा प्रारंभ;

## मशाल रॅलीने शहरात घुमला तरुणाईचा आवाज



**जालना । प्रतिनिधी -** येथील जेईएस महाविद्यालयाच्या वतीने आयोजित जे.ई.एस. युवा जल्लोष २०२६ या विद्यार्थी कला व क्रीडा महोत्सवाचा गुरुवारी अत्यंत उत्साहात प्रारंभ झाला. महोत्सवाची सुरुवात भव्य मशाल रॅलीने करण्यात आली, ज्यामध्ये विद्यार्थ्यांनी विविध घोषणा देत शहर परिसर दणाणून सोडला.

मशाल रॅलीने वेधले लक्ष

गुरुवारी सकाळी ६ वाजता महाविद्यालयापासून या मशाल रॅलीला सुरुवात झाली. यावेळी उपप्राचार्य डॉ. महावीर सदावर्ते, क्रीडा विभाग रॅली प्रमुख म्हणून प्रा.डॉ. दिलीप अर्जुने यांनी सुरुवात केली व क्रीडा संचालक डॉ. हेमंत वर्मा, प्रा. राहुल सरस्वत, प्रा. खलिफा, डॉ . किशोर बिरकायलु यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ही रॅली महाविद्यालयापासून सुरू होऊन झाशीची राणी पुतळा, मिशन हॉस्पिटल, राम मंदिर, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, बडी सडक मार्गे पुन्हा महाविद्यालयात येऊन विसर्जित झाली.

रॅलीचे उद्घाटन आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक प्रकाश दुसेजा सोबत राष्ट्रीय खेळाडू हिमांशीदुसेजा यांचे हस्ते करण्यात आले. व खेळाडूंची शपथ घेण्यात आली. रॅलीला संस्थेचे अध्यक्ष पुरुषोत्तम बगडिया, सचिव श्रीनिवास जी भक्कड यांनी शुभेच्छा दिल्या. क्रीडारॅलीसाठी पांढरा ड्रेस कोड निश्चित करण्यात आला होता, ज्यामुळे शिस्तबद्ध वातावरण पाहायला मिळाले.

महोत्सवातील पुढील आकर्षणे

महोत्सवांतर्गत प्रत्येक दिवसासाठी विशिष्ट रंग (ड्रेस कोड) निश्चित करण्यात आला असून, आगामी दिवसांत विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे:

६ फेब्रुवारी (लाल रंग): रांगोळी, विद्यार्थी संसद, फोटोग्राफी आणि रील मेकिंग स्पर्धा. तसेच विद्यार्थिनी व महिला शिक्षिकांसाठी पारंपरिक पाककृती, मेहंदी आणि साडी पॅकिंग स्पर्धा होतील.

७ फेब्रुवारी (निळा रंग): निबंध, काव्यवाचन आणि कथाकथन यांसारख्या साहित्यिक स्पर्धांसह गायन, नृत्य आणि कव्वालीचे सादरीकरण होईल. याच दिवशी आनंद नगरीचा आस्वाद घेता येईल.

९ फेब्रुवारी (हिरवा रंग): शेलापागोटे, कवी संमेलन आणि अभिरूप न्यायालय अशा नाविन्यपूर्ण कार्यक्रमांनी महोत्सवाची सांगता होईल.

या महोत्सवामुळे महाविद्यालय परिसरात चैतन्याचे वातावरण निर्माण झाले असून, विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घेऊन आपल्या कलागुणांचे प्रदर्शन करावे, असे आवाहन प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री, युवा जल्लोष प्रमुख डॉ. हेमंत वर्मा यांनी केले आहे.

---

## गोंधनखेडा आणि सावंगी गावातून मानव विकास मिशनची बस सुरू

### गावकऱ्यांसह विद्यार्थिनींनी केले स्वागत



**विशाल देशमुख**

**जाफ्राबाद -** गोंधनखेडा आणि सावंगी येथील सरपंच आणि ग्रामस्थांच्या अथक प्रयत्नांना यश आले असून दोन्ही गावातील मुलीसाठी मानव विकास मिशन ची बस सेवा आता गावातून सुरू झाली आहे. सावंगी आणि गोंधनखेडा येथील जवळपास दीडशेच्या वर मुली माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण घेण्यासाठी टेंभुर्णी येथे येत होत्या. जाफराबाद आगाराच्या बस दोन्ही गावात येत नसल्याने विद्यार्थिनींना फाट्यावरूनच बस मध्ये बसावे लागत असे. गोंधनखेडा खामखेडा गट ग्रामपंचायत चे सरपंच विठ्ठल गोरे आणि सावंगीचे सरपंच किशोर वरगणे यांनी गावातून बस सेवां सुरू न झाल्यास विद्यार्थिनी आणि ग्रामस्थांसह आंदोलन करण्याचा इशारा दिल्यानंतर जाफराबाद आगाराने मंगळवार ता. ३ पासून दोन्ही गावातून विद्यार्थिनींसाठी बस फेरी सुरू केली आहे.बस गावात आल्यावर दोन्ही गावातील ग्रामस्थांनी बसची आकर्षक सजावट करून चालक, वाहक यांचे स्वागत केले. गावातून फाट्यापर्यंत पायी जाण्याची पायपीट थांबल्यामुळे आणि शाळा सुटल्यावर गाडी थेट शाळेजवळून घरापर्यंत येत असल्याने सर्व विद्यार्थिनींनी देखील आनंद साजरा करत जाफराबाद आगाराचे आणि सरपंच विठ्ठल गोरे आणि किशोर वरगणे यांचे आभार मानले आहेत.

---

## युवकांना अर्थनीतीशी जोडणाऱ्या 'बजेट क्वेस्ट २०२६' स्पर्धेचे आयोजन

जालना, दि.५ (जिमाका) :- मेरा युवा भारत बजेट क्वेस्ट २०२६ चा भव्य आयोजन मेरा युवा भारत संस्थेद्वारे केंद्रीय अर्थसंकल्प २०२६ वर आधारित बजेट क्वेस्ट २०२६ या राष्ट्रीय स्पर्धेचे आयोजन ३ ते १७ फेब्रुवारी २०२६ दरम्यान ऑनलाइन पद्धतीने करण्यात आले आहे. तरी जालना जिल्ह्यातील युवकांनी मेरा युवा भारतद्वारे जिल्ह्यातील स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. ही स्पर्धा देशभरातील सर्व मेरा युवा भारत पोर्टलवर नोंदणीकृत युवकांसाठी खुली असून, यात अर्थसंकल्पाच्या तरतुदींबाबत त्यांची माहिती व समज तपासली जाईल. स्पर्धा दोन टप्प्यात घेतली जाणार आहे. पहिला टप्पा ऑनलाईन क्विझ घेण्यात येईल. ज्यामध्ये बजेट २०२६ च्या संबंधित मूलभूत बाबींबाबत प्रश्न विचारले जातील. दुसऱ्या टप्प्यात निबंध स्पर्धा घेवून त्यांना उमेदवारांना पंतप्रधान नरेंद्र मोदींशी व्हर्च्युअल संवादाची संधी मिळेल. या स्पर्धेचा उद्देश युवकांना अर्थनितीशी जोडणे आणि नागरिक केंद्रित बजेट बनवण्यास मदत करणे हा आहे. पोर्टलवर नोंदणी करून युवक आपले विचार राष्ट्रीय व्यासपीठावर मांडू शकतात. केंद्रीय युवक कार्यक्रम व क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडवीया यांनी या उपक्रमाचे उद्घाटन केले असून, विकसित भारताच्या दिशेने हे महत्त्वपूर्ण पाऊल आहे. असे जिल्हा युवा अधिकारी, मेरा युवा भारत, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

---

## सेवानिवृत्त नौदल अधिकारी वसंतराव दांदडे यांचे निधन



**जालना । प्रतिनिधी -** येथील गांधी चमन, मधुबन कॉलनीतील रहिवासी तथा सेवानिवृत्त नौदल व विक्रीकर अधिकारी वसंतराव तुळशीराम दांदडे यांचे आज गुरुवार दि. ५ फेब्रुवारी रोजी पहाटे ५ वाजता दुःखद निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ६५ वर्ष होते. त्यांच्या पश्चात पत्नी, प्रतीक व प्रीतम ही दोन मुले, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. किरण गरड यांचे ते मेहुणे होते. त्यांच्या पार्थिवावर सायंकाळी पाच वाजता रामतीर्थ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.